# उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा

मुंबई शहर, पूर्व उपनगरे व कोकण मंडळ कार्यक्षेत्र, कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, मुंबई
यांचे कार्यालय, गृहनिर्माण भवन, पोटमाळा, कक्ष क्र. १७६, वांद्रे (पूर्व), मुंबई — ४०० ०५१.

ईमेल — dyr.mhada176@gmail.com दुरध्वनी क्र. ०२२-६६४०५०९२/५०९३

---

जा.क्र. उपनि/ससं/स.सं/मुंशपूऊकोमं / बी - २ /१०१४/२०२४
दिनांक :- २४/०५/२०२४

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (५) सह कलम ७७ अ अन्वये आदेश.**

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (५) सह कलम ७७ अ मधील तरतूद.
२) श्री.नितीन आडकर यांचे दि.२४/११/२०२३ चे पत्र.

ज्याअर्थी, शुक्लेंद्र को-ऑप हौसिंग सोसायटी लि., इमारत क्र. १६५, कन्नमवार नगर - १, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०००८३ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आलेली सहकारी गृहनिर्माण संस्था आहे. आणि,

ज्याअर्थी, वरील संस्थेचे दैनंदिन कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे अधिनियम असे वाचण्यात यावे) आणि १९६१ चा नियम (यापुढे नियम असे वाचण्यात यावे) मधील तरतुदीनुसार व संस्थेच्या मंजूर उपविधीनुसार चालविणे संस्थेच्या व्यवस्थापक समितीवर बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी, वरील संस्था मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, च्या अधिपत्याखाली असून सदर संस्थेचे निबंधक उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर, पूर्व उपनगरे व कोकण मंडळ कार्यक्षेत्र, कोकण गृहनिर्माण मंडळ, मुंबई हे आहेत. आणि,

ज्याअर्थी, अर्जदार यांनी वाचावे क्र.२ अन्वये दि.२४/११/२०२३ च्या पत्रान्वये संस्थेच्या व्यवस्थापक समितीने सन २०२२ - २०२३ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा घेतलेली नाही. सदर वार्षिक सर्वसाधारण सभा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (५) अन्वये ३० सप्टेंबरपूर्वी घेणे बंधनकारक होते. परंतु विहीत मुदतीत व्यवस्थापक समितीने संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेतलेली नसल्याबाबत तक्रार केली आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेची सन २०२२ - २०२३ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा ३० सप्टेंबरपूर्वी घेतली नसल्याने महाराष्ट्र सहकारीसंस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (५)

अन्वये कार्यरत व्यवस्थापक समितीस संस्थेचे जबाबदार संचालक म्हणून राहण्यास निवडून येण्यास अथवा स्विकृत होण्यास ५ वर्षापर्यंत अपात्र करून का करण्यात येवू नये याबाबत आपले म्हणणे सादर करणेसाठी या कार्यालयात दिनांक २९/१२/२०२३, दि.१३/०२/२०२४, दि.०८/०४/२०२४ आणि दि.३०/०४/२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अर्जदार श्री.नितीन आडकर उपस्थित होते. संस्थेच्यावतीने कोणीही संस्था पदाधिकारी एकाही सुनावणीस हजर नव्हते. तसेच सदर प्रकरण दि. ३०/०४/२०२४ रोजी निर्णयासाठी बंद करण्यात येवून दोन्ही पक्षकारांना दोन आठवडयाची लेखी म्हणणे सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली सदर प्रकरणात संस्थेकडून कोणतेही लेखी म्हणणे सादर केल्याचे दिसून येत नाही.

ज्याअर्थी, संस्थेच्या व्यवस्थापक समितीने सन २०२२ - २०२३ या आर्थिक वर्षाची विहीत मुदतीमध्ये वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन केलेले नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७५ (५) अन्वये ३० सप्टेंबरपूर्वी घेणे बंधनकारक होते. परंतु विहीत मुदतीत व्यवस्थापक समितीने संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेतलेली नसल्याने उपविधीतील तरतुदीनुसार कर्तव्यामध्ये कसूर केल्याचे स्पष्ट होते. संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा मुदतीमध्ये घेण्यात आलेली नाही. त्यामुळे कलम ७५ (५) अन्वये संस्था पदाधिका-यांना अपात्र करण्याची विनंती केली. आणि,

ज्याअर्थी, वरील संदर्भ क्र.३ अन्वये सदर नोटिसची प्रत मुंबई जिल्हा को-ऑप हौसिंग फेडरेशन यांना अभिप्राय देणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु सदर प्रकरणी कोणतेही अभिप्राय प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. आणि,

त्याअर्थी, प्रस्तुत प्रकरणी संस्थेच्या तत्कालीन समिती सदस्यांनी त्यांची वैधानिक जबाबदारी पार पाडण्यामध्ये कसूर केलेला आहे. संस्थेच्या वार्षिक कामकाजास अहवाल ज्यामध्ये लेखापरिक्षण अहवाल, दोषदुरुस्ती अहवाल, लेखापरिक्षक नियुक्त संदर्भात निर्णय या सर्व बाबींवर संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा होणे व त्यास सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. अशी सभा आर्थिक वर्ष संपल्यानंतर ६ महिन्याचे आत म्हणजेच दि.३०सप्टेंबर पूर्वी घेणे संस्थेच्या समिती सदस्यांवर बंधनकारक आहे. अशी सभा मुदतीमध्ये न घेतल्यास सदस्यांना ५ वर्षापर्यंत समिती सदस्यपदी राहण्यास निवडून येण्यास अथवा स्विकृत होण्यास अपात्र ठरविणेबाबत कलम ७५(५) मध्ये तरतूद आहे. संस्थेचे अध्यक्ष, सचिव आणि खजिनदार यांनी संस्थेचे आर्थिक पत्रके तयार करून वार्षिक सर्वसाधारण सभा घेणेबाबतची कार्यवाही करणे आवश्यक होते. मात्र त्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा न घेण्यास संस्थेची व्यवस्थापक समिती जबाबदार असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये संस्थेचे तत्कालीन पदाधिकारी कलम ७५(५) अन्वये कार्यवाहीस पात्र ठरत असल्यामुळे संस्थेच्या व्यवस्थापक समितीस पुन्हा ५ वर्षासाठी

संस्थेच्या सदस्यपदी राहण्यास, निवडून घेण्यास अथवा स्विकृत होण्यास अपात्र ठरत असल्याने संस्थेच्या सभासदांची गैरसोय होऊ नये म्हणून संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे असे या कार्यालयाचे मत झाल्याने खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारीसंस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (५) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मी आदिनाथ दगडे, उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर, पूर्व उपनगरे व कोकण मंडळ कार्यक्षेत्र, कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, मुंबई याद्वारे शुक्लेंद्र को-ऑप हौसिंग सोसायटी लि., इमारत क्र. १६५, कन्नमवार नगर -१, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०००८३ या संस्थेच्या १) श्रीमती रुपाली राजेंद्र जळगांवकर, अध्यक्षा २) श्री.रणजित वसंत मडये, सचिव ३) श्री.विजय सखाराम मोरे, खजिनदार ४) श्री.संतोष दत्ताराम गुरव, समिती सदस्य ५) श्री.किंजवडेकर शैलेश प्रभाकर, समिती सदस्य ६) श्री.गाडे अनंत रघुनाथ, समिती सदस्य ७) श्री.वनकर नरेंद्र रमेश, समिती सदस्य या सर्व समिती सदस्यांना संस्थेच्या समिती सदस्य पदी राहण्यासाठी अथवा निवडून येण्यासाठी ५ वर्षाकरिता अपात्र घोषित करत आहे. सबब, संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणेसाठी **श्री.हेमंत गंगावणे, सेवानिवृत्त लेखापरीक्षक श्रेणी -१ सहकारी संस्था, मुंबई** यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांनी तात्काळ पदभार स्विकारावा व व्यवस्थापक समितीची निवडणुक शासनाच्या धोरणानुसार घेऊन नवनियुक्त व्यवस्थापक समितीकडे संस्थेच्या दप्तराचा मालमत्तेचा ताबा सुपूर्त करावा. प्राधिकृत अधिकारी यांनी कोणतेही धोरणात्मक निर्णय घेऊ नये.

प्राधिकृत अधिकारी यांना मानधन व अधिक प्रवास भत्ता असे २५००/- प्रति महा मंजुर करण्यात येत आहे. सदर खर्च संस्थेच्या निधीतुन करण्याचे आदेश देत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक २४.०५.२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी देत आहे.

दिनांक : २४/०५/२०२४
ठिकाण : मुंबई

(आदिनाथ दगडे)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, मुंबई शहर, पूर्व उपनगरे व कोकण मंडळ कार्यक्षेत्र,
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,म्हाडा, मुंबई.

**प्रति :-**

१) अध्यक्ष, सचिव, खजिनदार व व्यवस्थापक समिती सदस्य, शुक्लेंद्र को-ऑप हौसिंग सोसायटी लि., इमारत क्र. १६५, कन्नमवार नगर -१, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०००८३

आपणास कळविण्यात येते की, संस्थेवर नेमणुक केलेल्या प्राधिकृत अधिकारी यांना संस्थेच्या दप्तराचा /मालमत्तेचा ताबा त्वरीत देण्यात यावा.

२) श्री.हेमंत गंगावणे, सेवानिवृत्त लेखापरीक्षक श्रेणी -१ सहकारी संस्था, मुंबई, प्राधिकृत अधिकारी, शुक्लेंद्र को-ऑप हौसिंग सोसायटी लि., इमारत क्र. १६५, कन्नमवार नगर -१, विक्रोळी (पूर्व), मुंबई -४०००८३

वर नमुद संस्थेच्या दप्तराचा ताबा घेऊन संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरु करावे व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच कोणतेही धोरणात्मक निर्णय घेऊ नयेत, फक्त दैनंदिन कामकाज करणे. उपविधीमध्ये नमूद खेरीज इतर कोणतेही विषय सर्वसाधारण सभेपुढे ठेऊ नये.

३) श्री.नितीन आडकर, शुक्लेंद्र को-ऑप हौसिंग सोसायटी लि., इमारत क्र. १६५, सदनिका क्र.५१९१, कन्नमवार नगर -१, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०००८३

४) संस्थेचे नोटीस बोर्डावर (सर्व सभासदांच्या माहितीसाठी)
शुक्लेंद्र को-ऑप हौसिंग सोसायटी लि., इमारत क्र. १६५, सदनिका क्र.५१९१, कन्नमवार नगर -१, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०००८३

**प्रत : माहितीसाठी तथा पुढील कार्यवाहीसाठी**
व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., / मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि,/ ---- सहकारी बँक लि.,-------------, शाखा, मुंबई.

उपनिबंधक,
सहकारीसंस्था, मुंबई शहर, पूर्व उपनगरे व कोकण मंडळ कार्यक्षेत्र,
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा,